Lalita Gandbhir.
4200 North Ocean Drive.
1501-2
Riviera Beach, FL. 33504.
U. S. A.

# सुवर्णमध्य - भाग २

आणखी दोन वर्षे अशीच गेली. एके दिवशी सकाळी मी घरात एकटीच असताना मागची दरवाजाची बेल वाजली. दरवाजा उघडला तर टेड (Ted) मॉनिकाचा नवरा दरवाज्याबाहेर उभा होता. त्याच्या चेहेऱ्यावर राग, दु:ख, काळजी अशा अनेक भावनांचे मिश्रण होते. गुड मॉर्निंग वगैरे न म्हणता त्याने मला प्रश्न विचारला,

"तू आज मॉनिकाबरोबर गेली नाहीस?"

"नाही. जाणार होते पण बरं वाटत नव्हतं." मी.

"रीना तू खूपदा मॉनिकाबरोबर जातेस. तुम्ही दोघी काय करता?" त्याच्या या प्रश्नाने मी एकदम सावध झाले. भेदक डोळ्यांनी माझ्याकडे पाहत टेड म्हणाला, व माझ्या उत्तराची वाट पाहत होता.

उंच, ओबडधोबड, जेमतेम हायस्कूलपर्यंत पोचलेला टेड घरे बांधणाऱ्या एका कंपनीत नोकरीला होता. त्याचे बोलणे, वागणे, हसणे, एकदम मोकळे, निष्कपट पण रांगडे होते. मॉनिका व तो अगदी विसंगत होते. एखाद्या संगमरवरी पुतळ्याशेजारी खडक असावा तसा टेड मॉनिकाशेजारी दिसत असे. ते दोघे मॉनिका कॉलेजमध्ये असताना भेटले होते. टेड मॉनिकच्या कॉलेजमध्ये बांधकामासाठी काही महिने जात होता. तेव्हा मॉनिकाच त्याच्या प्रेमात पडली होती म्हणे. सहा महिन्यांनी कॉलेज संपल्यावर मॉनिकाने त्याच्याशी लग्न केले होते. सहवासाने टेडचं मॉनिकावर फार प्रेम आहे हे मला कळले होते. आम्ही सगळेच खूपदा भेटत असू. पण टेडशी मोकळेपणाने बोलायला मला अजून जमले नव्हते. त्याचे पुरुषी विनोद, गडगडाट करून हसणे, मोठ्यांदा बोलणे सगळेच माझ्या प्रकृतीविरुद्ध होते. तो व संजय, आम्ही सर्व एकत्र आलो की बिअर पिऊन बिझनेस काढायचे बेत करत असत. खूप पैसे कसे मिळवायचे याची शेख महमदी स्वप्नं पाहत असत. मी त्यांच्या गप्पात भाग घेत नसे. आज प्रथमच मी इतक्या वर्षांनी टेडशी एकटी बोलत होते.

मी काहीच उत्तर देत नाही असे पाहून टेडने वरच्या पट्टीत पुन्हा तोच प्रश्न विचारला. त्याला मॉनिकाबद्दल नक्कीच काहीतरी कळले होते. क्षणार्धात माझ्या मनात अनेक विचार चमकून गेले. मॉनिकाचे प्रेमप्रकरण असेल का? ती कुणाच्या जाळ्यात फसली असेल का? टेडला काय समजलंय? तिचे प्रेमप्रकारण असेल तर टेड खवळून रागाने भलतेच तर करणार नाही ना? शेवटी मॉनिकालाच

सावध केले पाहिजे असा मी निश्चय केला. माझे तेवढे कर्तव्य होते. टेडला शांत करण्यासाठी मी उलटा प्रश्न विचारला.

“एवढं सकाळी येऊन असा प्रश्न विचारण्याजोगं काय झालंय टेड? आम्ही शॉपिंग करतो, लायब्ररीत जातो, कधी कधी लंच घेऊन येतो तर कधी लंच रेस्टॉरंटमध्येही घेतो.” माझ्या उत्तराने प्रक्षुब्ध टेड शांत होण्याऐवजी घरात येऊन फेऱ्या मारू लागला- “तू काही तरी लपवतेस ?” माझ्याकडे रोखून पाहत टेड म्हणाला.

“टेड?” मी चिडल्यासारखे दाखविले. “मी खरं ते सांगतेय.” मला चिडलेली पाहताच टेड जरा शांत झाला. खुर्चीवर बसत म्हणाला.

“माझ्या एका मित्राने मॉनिकाला न्यूयॉर्कमध्ये गेल्या आठवड्यात पाहिले.”

“माणसासारखी माणसं दिसतात. टेड, तू सरळ मॉनिकालाच का विचारत नाहीस?” मी त्याला सल्ला दिला, “उगाचच चिडून काय उपयोग? तीच सांगेल तुला खरं काय ते !” टेडच्या मित्राची बातमी खरी असावी अशी मला जबरदस्त शंका होती.

टेड फुणफुणत निघून गेला. तो फार संतापला होता. तो गेल्याबरोबर मी ताबडतोब मॉनिका जात असे त्या बँकेच्या मॅनेजरला फोन केला. मॉनिकाचे नाव त्याने लगेच ओळखले. “ती अजून आलेली नाही.” असे तो म्हणाला. तेव्हा “ती आल्याबरोबर तिला मला फोन करायला सांगा, फार महत्वाचं काम आहे” असा मी त्याच्याकडे निरोप ठेवला. आणि अस्वस्थपणे मॉनिकाच्या फोनची वाट पाहत बसले.

दोन तासाने तिचा फोन आला, ‘मॉनिका, टेड आला होता. त्याच्या मित्राने तुला गेल्या आठवड्यात न्यूयॉर्कला पाहिलं म्हणे’ मी तिला हे सांगितल्यावर माझ्या मनावरचे मणामणाचे ओझे उतरले. मॉनिका अर्धा मिनिट बोलली नाही. मग ‘मी घरी येते’ म्हणून तिने फोनच ठेऊन दिला.

मला मॉनिकासाठी भीती वाटत होती पण अखेर तिचे रहस्य उलगडणार म्हणून एक प्रकारची उत्सुकताही वाटत होती.

मॉनिका तासाभरातच घरी आली. ती माझ्याकडे आली तेव्हा तिचा चेहेरा पांढरा फटक पडला होता. हात-पाय लटपटत होते. मी मुकाट्याने उठून तिला कॉफी करून दिली. “मॉनिका, दीड तासांनी टेड येईल. त्याला तू काय सांगायचं ते ठरवून ठेव. तो फारच भडकला आहे.” मी तिला हळुवारपणे सांगितले.

“तुला इतके दिवस माझं काही रहस्य आहे ते माहित होतं. पण तू ते लपवलंस. त्याबद्दल तुझे आभार मानावेत तेवढे थोडेच ! मी आता जाते. उद्या कदाचित तुला सगळं सांगेन. पण आता माझ्यात बोलण्याची शक्ती नाही.” खुर्चीवरून उठताना ती म्लान चेहेऱ्याने म्हणाली, “ माझे सगळे बेत पार फिसकटले.”

रात्रभर मॉनिकाच्या विचाराने मी तळमळत राहिले, शेवटी सकाळी मला राहवेना. म्हणून मी स्वतःहूनच मॉनिकाकडे गेले. मॉनिका बरीच सावरलेली दिसत होती.

"रीना, बरं झालं तू आलीस." ती दार उघडतच मला म्हणाली, "टेडने मला काहीच विचारलं नाही. तो काहीही न झाल्यासारखं वागला."

"कदाचित त्याला माझं म्हणणं पटलं असेल " मी सुचवले व म्हटले, "चला मग तर तुझी काळजीच मिटली."

"तसं नाही रीना. मी खरचं न्यूयॉर्कर्ला शटलने (विमानाने, Air Bus ने) गेले होते." म्हणजे माझी शंका अचूक होती तर! टेडच्या मित्राने खरोखरचं मॉनिकाला पहिले होते. "माझी आई बरीच आजारी आहे."

"तुझी आई !" आता मात्र मला आश्चर्याचा धक्काच बसला !

"रीना, मी अनाथ नाहीय. पुढच्या आठवड्यात तू माझ्याबरोबर न्यूयॉर्कला ये. मला सगळी हकीकत खुलासा करून सांगणं फार कठीण आहे. माझ्यासारख्या परिस्थितीत असलेल्या माणसालाच मला समजावून घेणं शक्य आहे. तरी पण तू समजू शकशील अशी मला आशा आहे. कारण तुझी विचारशक्ती प्रगल्भ आहे. म्हणून तू मला सुरवातीपासून आवडलीस. तू न्यूयॉर्कला आलीस की तुला सगळं आपोआप समजेल."

"पण.... पण आता न्यूयॉर्कला जाणं धोक्याचं आहे. टेड...टेड" मी तिच्या बेताला विरोध केला.

"मला जायलाच हवं म्हणून तुला बोलावते आहे. तू आलीस तर टेडला शंका येणार नाही."

मंगळवारी रात्री संजयने मला, "तू उद्या बॉस्टनला जाणार आहेस का ?" असा प्रश्न अगदी सहजपणे विचारला. मी त्या प्रश्नाने दचकले होते. टेडने संजयला काही सांगितलंय का? कशाला मी या नसत्या भानगडीत पडतेय? मी मॉनिकाला नकार देण्याचा खूप प्रयत्न केला होता. पण मॉनिकाने अगदी विनवण्या केल्या होत्या. डोळ्यांत पाणी आणले होते. ती काही बेकायदेशीर करत नाही ह्याची पुनःपुन्हा ग्वाही दिली होती.

"जाणार आहे, मी." मी संजयला मोघमच उत्तर दिले. तो पुढे काहीच बोलला नाही. सकाळी मी, मॉनिका लवकरच निघालो. मॉनिकाने कार एअर पोर्टवर पार्क केली. आम्ही शटल (विमान) पकडले. न्यूयॉर्कला एका कॅडीलॅकमध्ये (मोठी महागाईची कार) शोफर आमची वाट पाहत होता. आम्हाला पाहताच त्याने कारचा दरवाजा उघडला. आत बसल्यावर मी वेगळ्याच जगात पाउल टाकल्याचे मला जाणवले.

व्हेलव्हेटसारख्या कापडाच्या सीट्स, बटन दाबून वर-खाली होणाऱ्या खिडक्या, स्टिरिओ, टेपडेक सर्व काही त्या कारमध्ये होते. मला तर अगदी चोरट्यासारखे झाले. मॉनिका मात्र आरामात बसली होती.

कार समुद्राजवळच्या एका प्रशस्त बंगल्याजवळ येऊन थांबली. बंगला कसला तो महालच म्हणायला हवे त्याला ! सभोवार सहा फुट उंचीची सिमेंटची भिंत, मधोमध लोखंडी गजांचा कार आता जाऊ शकेल एवढा मोठा दरवाजा. बाजूलाच माणसांना आत जाण्यासाठी लहान दरवाजा. बंगला पूर्ण पांढरा, वरती मंगलोरी कौलांसारखी कौले. आसपास काळजीपूर्वक जोपासलेली बाग. मागे आमच्या

घरापेक्षा दुप्पट मोठा नोकरांना राहण्यासाठी बंगला. कार मोठ्या दरवाजासमोर थांबताच दारवान धावत आला. त्याने आमच्यासाठी मोठा दरवाजा उघडला. बंगल्याच्या मुख्य काचेच्या, लोखंडी नक्षीदार कलाकृतीने सजवलेल्या दरवाज्यातून आम्ही आत गेलो. आतला थाट पाहून मी जागेवरच खिळले. मऊ मऊ खोल गालिचे, भिंतीवर तऱ्हेतऱ्हेची चित्रे, जुने कोरीव काम व पॉलिश केलेले फर्निचर, सॅटिनचे गोंडे लावलेले पडदे, झुंबराचे दिवे. मी आ वासून बघत असतानाच मॉनिका आता गेलीसुद्धा !

पाच मिनिटांनी खाली आली तेव्हाही मी आ वासून बघतच होते. भिंतीवर मॉनिका सारख्या दिसणाऱ्या एका बाईचे पेंटिंग लावले होते.

“रीना, माझ्या आईला भेटायला येतेस?” मॉनिकाच्या प्रश्नाने मी भानावर आले. तसाच खोल रुजामा घातलेला जिना चढून आम्ही वर गेलो. एका कोपऱ्यातल्या बिछ्यान्यावर  एक वृद्ध स्त्री झोपली होती. ती आजाराने खंगलेली असली तरी मॉनिकामधले आणि तिच्यातले साम्य लपत नव्हते. जवळच एक युनिफॉर्ममधली नर्स उभी होती. आसपास आजारी माणसांच्या खोलीत असते तसले सामान होते.

“रीना ही माझी आई. आई ही माझी जिवश्चकंठ्श्च्य मैत्रीण रीना.” मॉनिकाने माझी ओळख करून दिली.

“हॅलो” मॉनिकाची आई क्षीण आवाजात म्हणाली. मग ती मॉनिकाकडे व रीनाकडे वळून म्हणाली, “तुम्ही दोघी आज इथेच राहा.” एवढ्या बोलण्याचाही तिला त्रास झालेला दिसला. तिने डोळे मिटले. मॉनिका व मी हळूच तिच्या खोलीतून बाहेर पडलो. एवढ्यात शोफर आत आला आणि, “बाहेर दरवाज्यावर दोघेजण आले आहेत तुम्हाला भेटायचंय  असं म्हणताहेत. जा म्हटलं तर ऐकत नाहीत.” असे सांगू लागला. आम्ही दोघींनी हळूच खिडकीबाहेर पहिले. दारवानाशी हुज्जत घालत टेड व संजय उभे होते. मी चांगलीच घाबरले होते तरी पण प्रसंगावधान ठेऊन मी मागच्या दरवाजाकडे बोट दाखविले.

“तिकडून निसटू या आपण?”

“काही उपयोग होणार नाही.” मॉनिका खुर्चीवर बसत म्हणाली. “आज लपंडावाचा खेळ संपला कारण आज मी निसटले तरी पुढच्या आठवड्यात काय करीन?”

मॉनिका मग उठून बाहेर अंगणात गेली. तिला पाहताच टेड ओरडला, “ती....ती माझी बायको आहे मी आत जाणारच.”

“येऊ दे त्यांना आत” मॉनिकाने दारवानला सांगितले.

टेड व संजय आत आले. आतल्या दिवाणखान्यात शिरताच त्यांचीही माझ्यासारखीच अवस्था झाली. आ वासून इकडे तिकडे दोन मिनिटे पाहिल्यावर टेड शुद्धीवर आला. मॉनिका त्यांच्या हालचालीचे निरीक्षण करत खुर्चीवर बसली होती. तिच्याकडे पाहत टेड ओरडला,

“मॉनिका, तू इथं काय करतेस ?”

"टेड, हे घर माझंच आहे." मॉनिकाने शांतपणे त्याला उत्तर दिले.

"तुझं? तू काय दुसरं लग्न केलंस की काय?" टेडचा विश्वास बसलेला दिसला नाही.

"नाही हे माझ्या आजोबांचे घर आहे. सध्या इथं माझी आई राहते. पण ते माझ्याच नावावर आहे."

"मॉनिका थापा मारू नकोस." टेडचा अजूनही विश्वास बसत नव्हता.

"खरंच सांगतेय मी "मॉनिका उभी राहत म्हणाली, "आत ये, माझ्या आईला भेटायला."

एव्हाना मॉनिकच्या आईचे तैलचित्र टेडच्या भिरभिरत्या नजरेला दिसले होते. तो गोंधळून विचार करत मॉनिकाबरोबर आत गेला. संजय व मी बाहेरच गप्प बसून राहिलो.

"माझा विश्वासच बसत नाहीय." थोड्या वेळाने संजयने बोलायला सुरवात केली. "तू इतके दिवस माझ्यापासून सगळं लपवलंस..." त्याचे बोलणे पुरे व्हायच्या आतच मॉनिका व टेड बाहेर आले.

"आई जागी झाल्यावर तुझ्याशी बोलेल." मॉनिका टेडला म्हणत होती. आणि टेड आता पूर्ण गोंधळलेला दिसत होता. शेवटी त्याने विचारले, "मॉनिका, तू इतके दिवस माझ्याशी का लपवाछपवी केलीस ?"

"कारण... कारण... तुला समजणं कठीण आहे. गर्भश्रीमंतीत जन्मल्याशिवाय गर्भश्रीमंतीची दु:खं समजणार नाहीत." मॉनिकाने अडखळत उत्तर दिले.

"ह्या घरात तुला कसले दु:ख होते मॉनिका?" टेडने अविश्वासाने विचारले.

"हळूहळू सिद्ध करून दाखवते." मॉनिका शांतपणे म्हणाली.

(क्रमश:)

**ललिता गंडभीर**

पूर्वप्रसिद्धी : माहेर, ऑगस्ट १९८६ .
तारेवरची कसरत, विद्या प्रकाशन, जून १९८७.